डिसेंबर ०७, २००७

**परदेशामधून स्वस्त निधीचे प्रेषण करण्याच्या खोट्या प्रस्तावांबाबत आर बी आयचा जनतेला सावधानतेचा इशारा**

परदेशातील व्यक्तींनी / संस्थांनी, भारतामधील बँकांमध्ये / भारतीय रिझर्व्ह बँकेमध्ये निधी जमा केला असल्याच्या व तो स्वस्तामध्ये देण्याच्या खोट्या प्रस्तावांना बळी न पडण्याचे आवाहन भारतीय रिझर्व्ह बँकेने आम जनतेला केले आहे. अशा अज्ञात संस्था / व्यक्तींच्या योजना / प्रस्तावांमध्ये जनतेने भाग घेऊन त्यासाठी कोणतेही प्रेषण करू नये.

अशा प्रस्तावांच्या विशिष्ट अशा कार्यरीती बाबत भारतीय रिझर्व्ह बँक सांगू इच्छिते की, काही विदेशी संस्था / व्यक्ति तसेच अशा संस्था / व्यक्तींचे प्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या व्यक्तीही, टपाल / ई-मेल द्वारा, विदेशी चलनामध्ये मोठी रक्कम भारतातील रहिवासी व्यक्तींना / संस्थांना ( म्हणजे शाळा / रुग्णालये) त्यांच्या धंद्या/ व्यवसायात मदत म्हणून देऊ करण्याचा प्रस्ताव पाठवितात. एकदा असा संबंध जुळला की त्यांच्या प्रस्तावाबरोबरच ते त्या भारतीय व्यक्ती / संस्थांना त्यांच्या बँक खात्याची माहिती द्यावयाची विनंती करून, त्या प्रस्तावाचे पैसे पाठविता यावेत म्हणून त्यांना काही रक्कम सुरुवातीची ठेव / कमिशन म्हणून पाठविण्यास सांगतात. तसेच अलिकडील भूतकाळात देखील, विदेशातील लॉटरी स्कीम्समध्ये मिळालेल्या बक्षिसांबाबत कमिशन / शुल्क रुपाने विदेशी चलनाच्या स्वरुपात धनप्रेषण करण्याबाबत व्यक्ती / अधिकृत व्यापाऱ्यांकडून रिझर्व्ह बँकेकडे मंजुरी / स्पष्टीकरणाचे संदर्भही आले आहेत. रिझर्व्ह बँकेच्या असेही नजरेस आले आहे की काही विदेशी संस्था भारतातील व्यक्ति / कंपन्या / ट्रस्ट ह्यांना कळवीत आहेत की भारतात स्वस्त दराने कर्ज वाटप करण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या खात्यात प्रचंड मोठ्या रकमा ठेवल्या गेल्या आहेत व त्या रिझर्व्ह बँकेच्या मंजुरीनंतरच वाटल्या जातील. त्यांच्या ह्या दाव्याच्या पुष्टिसाठी रिझर्व्ह बँकेने दिली आहेत अशी वाटणारी प्रमाणपत्रे / ठेवींच्या पावत्यांच्या प्रतीही अशा व्यक्ती उपलब्ध करतात.

भारतीय रिझर्व्ह बँक आज स्पष्ट करत आहे की लॉटरी स्कीम्स मध्ये भाग घेण्यासाठी कोणत्याही स्वरुपात धनप्रेषण करण्यास विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम १९९९ च्या अन्वये बंदी आहे. याशिवाय, हे निर्बंध, मनी सर्क्युलेशन स्कीम ह्या सारख्या निरनिराळ्या नावाखाली चालणाऱ्या लॉटरी योजनांसाठी करावयाच्या धनप्रेषणासाठी किंवा मिळालेल्या बक्षीसाची रक्कम मिळविण्यासाठी करावयाच्या धनप्रेषणाबाबतही लागु आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने याशिवाय असेही स्पष्ट केले आहे की तिच्याकडे अशा योजनांच्या व्यक्ती / कंपन्या / ट्रस्ट ह्यांच्या नावे निधी वाटपासाठी कोणतेही खाते नाही.

जी. रघुराज
उप महाव्यवस्थापक

वृत्तपत्रांसाठी वितरण : २००७-२००८/७७०